# बोनसाय

बोन्साय याचा शब्दशः अर्थ पसरट भांड्यातील झाड. बोन म्हणे ट्रे किंवा उथळ पसरट पात्र व साय म्हणजे रोप (वनस्पती). बोन्साय म्हणजे चिमुकला वृक्ष. मोठ्या वृक्षाची छोटी प्रतिकृती. खूपदा नैसर्गिक खुरटलेले पण सुंदर आकराचे वृक्ष कलात्मकदृष्ट्या उथळ पात्रात ठेवतात. ज्याद्वारे पुरातन वृक्षाची भव्यता, पुरातनता आणि सुंदरता प्रतिबिंबित होते.

**बोन्सायचा इतिहास:**

वास्तविक पाहता बोन्साय किंव्हा वृक्षवामनीकरण ही कला भारतीय आहे. औषधी उपयोगाच्या वनस्पती जतन करणे व हाताशी ठेवणे या वृक्षवामनीकरणाचा हेतू होता.

बौद्धांनी धर्म प्रसाराबरोबर ही कला प्रथम चीन मध्ये नेली. तेथून ती जपान मध्ये गेली जपानी लोकांनी ही कला अभ्यासूपणे जोपासली व पूर्णत्वास नेली. अशा प्रकारे की, ही कला जपानी कला म्हणून ओळखली जाते आहे.

भारतीय वैद्यांनी ही कला निसर्गापासून घेतली त्यांनी कुठेतरी खडकांत, पर्वतावर कमी मातीत, पुरेशा पाण्या अभावी छाटलेले आकर्षकपणे वळलेले वृक्षबटू पहिले व तसेच कृत्रिमपणे निर्माण करू लागले.

जपान्यांनी ही कला काही शतके जोपासली आहे. तिथे १००, २५०, ३०० वर्षांचे वृक्षबटू आढळतात. काही घराण्यात त्याची एखाद्या मौल्यवान वडिलोपार्जित ठेव्या प्रामाणे. पिढ्यानपिढ्या काळजी घेतली जाते.

छंद म्हणून बागेतला बोन्साय हा निराळाच पण सर्वोपरी प्रकार म्हणता येईल. वृक्षबटू वाढविणे हा आगळाच आनंद आहे. सतत मन मोहविणारा हा छंद आहे.

काही लोकांना वृक्षाचे वामनीकरण दुष्टपणा वाटतो. मोठ्या वाढणाऱ्या वृक्षावर अन्याय वाटतो. काही अंशी ते खरेही आहे. पण हजारो वृक्षाच्या जाती दार वर्षी निष्काळीपणामुळे नष्ट होत आहेत. त्यापैकी पुष्कळदा जाती त्याचे वामनीकरण करून आपण वाचवू शकू. वामनवृक्षाची पुरेशी काळजी घेतल्यानंतर पूर्णाकार होऊ शकतो. अश्या वृक्षांचा अभ्यास करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो.

ऊन, वारा, पाऊस, दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीना तोंड देऊन दिमाखदारपणे उभे राहणाऱ्या पुरातन वृक्षाच्या छोटेखानी सुंदर प्रतिकृती म्हणजे वृक्षबटू. त्यांचा बुंधा, फांद्या, मुळे व एकंदर रचना यांचा आविष्कार आल्हाददायक असावा. नैसर्गिक वृक्षांचा जिवंतपणा आणि जोमदारपणा यात प्रतीत व्हावा.

बोन्साय म्हणजे छाया पसंद Indoorplant रोपे नव्हे. तुम्ही त्यांना कधीतरी घरात आणू शकता किंवा भरपूर ऊन मिळणाऱ्या दक्षिणेकडील खिडकीत तो ठेवू शकता.



**बोनसायसाठी तीन गोष्टी महत्वाच्या:**

१. पात्र किंवा कुंडी

२. माती

३. रोप

१ व २ हे जडतेचे किंवा भौतिकतेचे प्रतीक तर वृक्ष हे चेतनाचे. वेगवेगळ्या प्रकारचे दगड ही जडतेची विविधता प्रकट करतात.

बोनसाय म्हणजे ट्रे-ट्री. म्हणून खूपदा पसरत, उथळ कुंड्या वापरल्या जातात. त्या माती, चिनी माती, किंवा सिमेंटमध्ये उपलब्ध असतात. आकर्षक आकाराचे खंगरही यासाठी वापरता येतात.

**कुंडी:**

कुंड्यांत पाणी जाण्यासाठी छिद्र असावे. सुरुवातीला मातीच्या कुंड्या वापराव्यात. फार नक्षीच्या कुंडया नकोत. कारण मुख्यत्वे वुक्षची आकर्षकता महत्वाची आहे, कुंडीची नव्हे.

उपरोक्त सर्व साहित्य औजारे, बोनसाय टूल किट पल्लवांकुर नर्सरीमध्ये उपलब्ध आहे.

कुंडी व वृक्षबटु परस्परांना पूरक असावी. कुंडीची निवड करतांना वृक्षाचा आकार व रचना विचारात घ्यावी. उदा.

१. उभा सरळ वृक्ष / छत्रीचा आकार - गोल किंवा चौकोनी कुंडी

२. उतरता वृक्ष - उंच आकाराची कुंडी

३. अर्ध उतरता वृक्ष - चौकोनी किंवा गोल आकाराची माध्यम उंचीची कुंडी / विविध आकार

**माती:**

पाण्याचा निचरा तर व्हावा आणि वृक्षाचे पुरेसे पोषणही व्हावे अश्या प्रकारची माती असावी. माती निर्जंतुक असावी त्यात वाजवीपेक्षा जास्त खात नको. उन्हात ठेऊन निर्जंतुक करून घेता येईल.

नैसर्गिकपणे मिळणाऱ्या मातीत हे गुण असतील असे नाही. तेंव्हा विटांचा चुरा आणि माती उत्तम कुजलेले खत मिसळून व तीन चार प्रकारच्या चाळणीतून चाळून घेऊन आपणांस हवी तशी माती मिळवता येते.

हे मिश्रण प्रथम मोठ्या छिद्राच्या (ज्याद्वारे काबुली चण्याएवढे तुकडे चाळणीतून पडतील अश्या चाळणीतून चाळावे. नंतर सपीटाच्या चाळणीने चालून बारीक पूड काढून टाकावी. मग माध्यम आकाराच्या चाळणीतून चाळून चवळी एवढा चुरा एका बाजूला काढून ठेवावा. नंतर लहान चाळणीतून चाळून मुगाएवढा बाजूला ठेवावा. ही सर्व मिश्रणे वेगवेगळ्या डब्यांमध्ये ठेवावीत.

चण्याएवढा चुरा कुंडीच्या तळाशी ठेवावा, त्यावर चवलीएवढा व त्यावर भुगा टाका. दुसऱ्या व तिसऱ्या थरांत रोपांची लावणी करावी.

वरील मिश्रण कश्या प्रकारचे घ्यायचे हे तुम्ही जो वृक्ष लावणार आहात त्यांवर अवलंबून राहील.

**वृक्ष अथवा रोप:**

कुठल्याही वृक्षाचे बोनसाय करता येईल. एकंदर वनस्पतीमुळे ४० टक्के वृक्ष असतात, त्यापैकी ८०% वृक्षांचे तुम्ही बोनसाय करू शकता. पण झपाट्याने वाढणाऱ्या मोठ्या पानाच्या वृक्षांची निवड करू नये. तंतुमय रोपांचे बोनसाय होत नाही. उदा. नारळ

**बोनसायसाठी योग्य असणारी फुलझाडे**

१) अडेनियम ओबेसम

२) आल्मन्डा- छाटणी सतत करावी

३) ड्युरांटा

४) तगर

५) कुंद

६) जास्वंद

७) इक्झोरा

८) कुंती

९) बोगनवेलीया

१०) अबोली

११) जट्रोफा

१२) टणटणी

१३) मासफिंजिया

१४) मिनिएचर / चिमुकले गुलाब

१५) मुसेंडा



१६) कण्हेर
१७) ऑक्सॉलिस रक्तपर्णी
१८) चित्रक
१९) बिट्टी
२०) जेड
२१) फायकस निदिका
२२) फायकस बेंजामिना
२३) लार्जस्ट्रा
२४) कासुदा



**बोनसायसाठी योग्य असणारी पर्णवृक्ष किंवा पर्ण झुडुपे**

१. अरेलिया
२. अशोक
३. अर्जुन
४. वड
५. बांबू ६. बॉटल ब्रश ७. ख्रिसमस ट्री ऑरोकारिया ८. कॅज्युरीना ९. वड पिंपळाच्या विविध जाती १०. कढीपत्ता ११. पाइन्स - सूचीपर्णी १२. ज्युनिपरस १३. सिल्व्हर ओक १४. शिशु १५. मोरपंखी १६. रोपियोका १७. गुलमोहर

**बोनसायसाठी योग्य असणारी फळझाडे**

१) चिकू २) काजू ३) सीताफळ ४) करवंद ५) लिंबू वर्गातील रोपे ६) जांभूळ ७) पेरू/ चिनी पेरू ८) डाळिंब ९) चिंच १०) आंबा ११) अंजीर १२) शोभेचा करवंद

**वृक्षाची निवड**

कामे उंचीचे, जाड बुंध्याचे, पुष्कळ फांद्या आणि पाने असणारे रोप निवडावे. आकर्षक पाने व फळे असणारे निवडावे. फांद्यांचे आकार आकर्षक असावेत. कलमी रोपाचे कलम बेमालूम असावे. जपानमध्ये निसर्गतः मिळणारी रोपे घेऊन सुरुवात करतात. थोड्या काळात बोनसायचा अभ्यास निर्माण करण्यासाठी मध्यम आकाराच्या कुंडीत भरपूर खतपाणी घालून रोप लावावे. त्याला योग्य प्रकारे खत पाणी करावे व नवीन अनावश्यक फूट काढून टाकून योग्य आकार द्यावा. बुंधा योग्य जाडीचा झाला व आकार उत्तम झाला की रोप उथळ कुंडीत लावावे (पावसाळ्यात).

**बोनसायची छाटणी**

ज्या रोपाचे बोनसाय करावयाचे ते कुंडीत वाढू लागले की प्रथम मुख्य दांडी कापावी. त्याच्या खालील डोळ्यांतून नवीन फांद्या येतील. त्या फांद्या काही अंतरावर कापाव्या म्हणजे रोप भरगच्च होईल. साधारणतः एकाआड एक फ़ांद्या ठेवाव्यात.
रोपांची पुनर्लावणी करतांना मुख्य मूळ अर्ध्यावर कापावे व बाजूचे एक तृतियांश किंवा जरुरीप्रमाणे जरूर असेल तर रोपाच्या मुळ्या तांब्याच्या तारेने बांधाव्यात व फांद्यांनाही आकार द्यावा. काही दिवस रोप बरे दिसत नाही.
रोपांना आकार देतांना कल्पना शक्तीचा वापर करा. बुंध्या फार खोल जमिनीत नको. वृक्षाची आकर्षक बाजू पुढे येईल अश्या प्रकारे ठेवा.

**कुंड्या ठेवण्याची जागा**

नुकत्याच लावलेल्या कुंड्या काही दिवस (८ ते १०) थंड जागी ठेवा. फक्त सकाळी कोवळे ऊन द्या. हळू हळू वाढतील तसे रोप बाहेर ठेवा. जपानमध्ये लाकडी बाकांवर ही रोपे ठेवण्याचा रिवाज किंवा परंपरा आहे. आपण लोखंडी स्टॅन्डवरदेखील ठेवू शकतो. नाजूक रोपांना उन्हाळ्यात छाया करावी.

**नवीन फूट**

नवीन येणारी फूट वाढ दिली तर रोपांची पोषकद्रव्ये वाया जातील व रोपांचा जोमदारपणा नष्ट होईल. दाट वाढलेल्या फांद्या विरळ ठेवाव्यात. सतत छाटणीने फांद्या बेढब वाढत नाहीत. आणि छोट्या छोट्या फांद्यांना पुरेसे पोषण मिळते. पोषकद्रव्ये वाया जात नाहीत. सर्व फांद्यांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळतो.

**खुडणीसाठी लक्षात ठेवा**

१. नवीन लावलेल्या (मुळ्या कापून ) रोपांना पुरेसा अवधी द्या.
२. फार जुन्या तोडल्या की डाग राहतो व बरा दिसत नाही.
३. सतत छाटणीच करत राहिले तर रोप निर्जीव दिसेल

**फांद्यांना द्यावयाचा आकार**

रोप चिमुकले आहे म्हणून त्याला बोनसाय म्हणता येणार नाही. त्याच्या फांद्यांचा व्यवस्थित आकार व मांडणी त्यासाठी आवश्यक आहेत. आकार देतांना फार ताण देऊ नये. हे काम सोपे नाही. त्यासाठी ज्ञान व अभ्यास हवा. वृक्षांना इजा ना पोहोचवता हे करता आले पाहिजे.

१. नको असलेल्या फांद्या कापा
२. दोऱ्याने वा तांब्याच्या तारेने फांद्या बांधून वळवा
३. त्यासाठी आवश्यक टी हत्यारे वापरा
४. फक्त जून रोपांनाच तयार बांधा

**हत्यारे**

१. रूट कटर - तार कापण्यासाठी
२. पकड - तारा पकडण्यासाठी
३. कॉपर वायर - ५. १६ एम एम / ५.२६ एम एम कोरड्या जागी ठेवावी
४. प्लास्टिकचे जाळीदार कापड
५. चाळण्यासाठी किमान ३ प्रकारच्या चाळण्या
६. सिकॅटर
७. टब

**फांद्या बांधण्याआधीची पूर्वतयारी**

१. आधीच्या वर्षी पुरेशी खते द्यावीत
२. खूप पाणी देणे टाळावे. त्यामुळे फांद्या कठीण होतात
व वळविणे कठीण जाते.
३. माती साधारणतः कोरडी असावी.
४. हत्यारे स्वच्छ असावी. गंज लागलेली नसावी.
५. छायेमध्ये काम करावे. उन्हात नको.
६. रोपाचे दर्शनी भाग व मागील भाग निश्चित करावा.



**रचना (स्टाइल्स)**

१. सरळ बुंध्याचे वृक्ष फॉर्मल अपराईट छत्रीप्रमाणे किंवा त्रिकोणी आकार जपानी -चोक कॅन
२. तिरक्या बुंध्याचे वृक्ष
३. तिरके वृक्ष slanting
४. दुहेरी बुंधा (ट्वाइन वृक्ष) twine trunk
५. बहुबंधी - मल्टी ट्रंक
एकाच मुळापासून खूप बुंधे
६. लोंबते वृक्ष - फांद्या अश्या प्रकारे वळविलेल्या असतात की त्या कुंडीच्या बाजूला, पण तळापासून वर राहतात.
जपानी शब्द- हॅन केन्माई
इंग्रजी शब्द - कॅस्केड
७. पूर्ण लोंबते - फांद्या अश्या प्रकारे वळविलेल्या असतात की त्या कुंडीच्या तळाच्याही खाली जातात
८. कललेले वृक्ष - ४५ अंशापेक्षा जास्त तिरका बुंधा
९. वळणावळणाचा बुंधा - ट्विस्टेड ट्रंक
१०. वनराई - एकाच जातीच्या रोपांची ओळ (विषम संख्या) फॉरेस्ट स्टाईल
जपानी शब्द - योसे ए
११. मुळे जुळलेले - रोपांची मुळे एकमेकांशी जुळलेली
१२. पर्वत वृक्ष - खडकावर लावलेला वृक्ष - खंगरात लावतात
जपानी शब्द - इशी झुके किंवा इशी झुकी

**वेळापत्रक**

१. उन्हाळ्यात पाणी दोनदा वा एरवी रोज एकवेळ
२. महिन्यातून एकदा सौम्य कीटकनाशक मारा. थंडीच्या दिवसांत मध्यम नोव्हेंबरमध्ये जानेवारी टाळावे. ही बदलून वापरावी. उदा. रोगोर, मॅलिथिऑन (अर्धा लिटर पाण्यात ८ थेंब)
३. पूर्वी बोनसायला खत देण्याची पद्धत नव्हती. परंतु आजकाल देतात. व ते आवश्यक आहे. १/२ सुफला १/२ लिटर पाण्यात घालून घ्यावे. १५ दिवसांनी खत द्यावे. त्याचप्रमाणे रोपवाटिकेत / गार्डन सेंटरमध्ये बॉन्ग्रो म्हणून लिक्विड उपलब्ध आहे. माती मुळांना धक्का ना लावता सैल करावी व नवीन घ्यावी. १५ किंवा २१ दिवसांनी हे कुंडी फिरवत राहावी.

